|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विचारधारा प्रशाळा

### कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्र

दिनांक: 08/01/2019

प्रति,
मा. प्राचार्य,
संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये

**विषय - नवोदितांसाठी कवितालेखन मार्गदर्शन कार्यशाळेतील विद्यार्थिनींच्या सहभागाबाबत.**

महोदय,

विद्यापीठातील कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनुदानातून **नवोदितांसाठी कवितालेखन मार्गदर्शन कार्यशाळा** आयोजित करण्यात येत आहे.

**नवोदितांसाठी कवितालेखन मार्गदर्शन कार्यशाळा : मंगळवार, दि. 12 फेब्रुवारी 2019**
**सकाळी 10.00 ते संध्याकाळी 4.00**
**कार्यशाळेचे स्थळ: सभागृह, पर्यावरणशास्त्र विभाग, क. ब. चौ. उ. म. वि., जळगाव.**

सदर कार्यशाळा फक्त विद्यार्थिनींसाठी असून आपल्या महाविद्यालयातील **कमाल दोन विद्यार्थिनींनी** त्यात सहभागी होणे अपेक्षित आहे. विद्यार्थिनींची निवड करताना कवितेची, कवितालेखनाची आवड असणाऱ्या, साहित्याची आवड असणाऱ्या विद्यार्थिनींची निवड करण्याची दक्षता बाळगावी. निवडलेल्या दोन विद्यार्थिनींची नावे प्राचार्यांची सही, शिक्का यासह महाविद्यालयाच्या लेटरहेडवर दि. 02 फेब्रुवारी 2019 पर्यंत डॉ. आशुतोष पाटील, प्रमुख, कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्र, विचारधारा प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-425001 या पत्त्यावर पाठवावीत. (संपर्क: 9823365190, ईमेल पत्ता: pashutosh30@gmail.com) कार्यशाळेत केवळ तीस विद्यार्थिनींचा समावेश करणे शक्य असल्यामुळे दिलेल्या मुदतीत प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनींचीच नावे विचारात घेता येतील याची नोंद घ्यावी.

कार्यशाळेतील सहभागासाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. विद्यार्थिनींचा प्रवासखर्च संबंधित महाविद्यालयाने करणे अपेक्षित आहे. कार्यशाळेत मराठीतील मान्यवर कवी, समीक्षक विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणार आहेत. त्याचा लाभ विद्यार्थिनींना करून घेता यावा यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींना कार्यशाळेस पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

डॉ. आशुतोष पाटील
प्र. प्रमुख
कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्र

प्रा. डॉ. अनिल डोंगरे
संचालक
विचारधारा प्रशाळा